आय विटनेस

# केवढा मोठा सरकता जिना



मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या वतीने कुलाबा - वांद्रे - सीप्झ असा भुयारी मेट्रो ३ मार्ग बांधण्यात येत असून, आता याच मार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ स्थानकात सर्वात उंच सरकते जिने बसविले जात आहेत. कॉर्पोरेशनच्या दाव्यानुसार देशातील कोणत्याच स्थानकांमध्ये एवढ्या मोठ्या उंचीचे जिने अद्याप बसविण्यात आलेले नाहीत. या स्थानकात आठ जिने बसविले जाणार आहेत. चार जिने बसविण्याचे काम झाले आहे. उर्वरित जिने बसविण्याचे काम सुरु आहे. हे जिने बसविण्यासाठी २५० टन वजनाच्या क्रेनचा वापर केला जात आहे. जिने १९.१५ मीटर उंचीचे आहेत.